# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 04.04.2026** **वार- शनिवार**

---

**सचिव**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार यांनी आज पुण्यातील भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था तसंच राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय या संस्थांना भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी एफटीआयआय मधील नव्यानं उभारण्यात आलेल्या चित्रपट प्रदर्शन कक्ष, संपादन सुविधा आणि चित्रपट निर्मिती स्टुडिओंची पाहणी केली. तसंच चित्रपट निर्मिती आणि संपादन क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि संस्थेमध्ये दिल्या जाणाऱ्या चित्रपट शिक्षण व्यवस्थेचा आढावा घेतला. यानंतर त्यांनी राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला भेट देऊन नॅशनल फिल्म हेरिटेज मिशन अंतर्गत सुरू असलेल्या चित्रपटांच्या डिजिटायझेशन प्रकल्पांची माहिती घेतली.
या प्रसंगी एफटीआयआयचे कुलगुरू धीरज सिंग, एनएफडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मगदूम, तसंच आकाशवाणीचे अधिकारी आणि एफटीआयआयचे प्राध्यापक सदस्य उपस्थित होते.

**प्रमाणीकरण**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुणे जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. बारामती विधानसभा पोट निवडणुकीच्या अनुषंगानं निवडणूक प्रचाराच्या जाहिरातींचं पूर्व प्रमाणीकरण या समितीकडून करुन घेणं आवश्यक आहे, असं जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी तसंच समितीचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी सांगितलं. उमेदवारांमार्फत प्रचारासाठी इलेक्ट्रॉनिक, समाज माध्यमे तसंच फिरत्या एलईडी व्हॅन, ऑटो रिक्षा आदी बाह्यमाध्यमांवरून देण्यात येणाऱ्या श्राव्य, दृकश्राव्य जाहिरातींचं पूर्व प्रमाणीकरण या समितीमार्फत केले जाते. तर मुद्रीत माध्यमात मतदानाच्या दिवशी किंवा मतदानाच्या एक दिवस अगोदर प्रकाशित करावयाच्या जाहिराती समितीकडून पूर्व प्रमाणीकरण करून घेणं बंधनकारक आहे.

**बारामती**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या अनुषंगानं नियुक्त नोडल अधिकारी आणि क्षेत्रीय अधिकारी यांची निवडणूक निर्णय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी कामकाजासंदर्भात आढावा बैठक घेवून काल मार्गदर्शन केलं. निवडणुकीच्या अनुषंगानं नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि शांततेत आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांनी समन्वयानं कामं करावीत, असे निर्देश दिघे यांनी दिले.

**मालमत्ता-कर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाच्या सुलभ, तंत्रज्ञानाधारित उपक्रमांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मालमत्ता कर भरण्यासाठी ऑनलाईन माध्यमाला मोठी पसंती मिळत असल्याची माहिती उपायुक्त सचिन पवार यांनी दिली. गेल्या आर्थिक वर्षात 7 लाख 87 हजारपेक्षा जास्त मालमत्ताधारकांपैकी ६ लाखांपेक्षा जास्त मालमत्ताधारकांनी 961 कोटी रुपयांपेक्षा जास्त मालमत्ता कर भरला आहे. यापैकी 697 कोटी रुपयांपेक्षा जास्त कर ऑनलाईन माध्यमातून भरण्यात आला आहे.

**ऑक्सीजन-पार्क**

निगडी परिसरातील नागरिक आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त प्रयत्नातून तयार झालेला ऑक्सिजन पार्क हा एक अनोखा आदर्श असा पर्यावरणपूरक उपक्रम आहे असं मत महापौर रवि लांडगे यांनी या पार्कच्या उद्घाटनप्रसंगी काल व्यक्त केलं. सेक्टर 26 मध्ये स्थानिक रहिवासी आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या सहभागातून हा पार्क विकसित करण्यात आला आहे. शहरातील 203 पैकी 25 ते 30 उद्यानांमध्ये अशी संकल्पना लोकसहभागातून राबविण्यात येईल, असंही लांडगे यांनी सांगितलं.

**फलाट**

पुणे रेल्वे स्थानकावर सहा नवीन फलाट बांधण्याचं काम सुरु असून ते टप्प्याटप्प्यानं पुढील वर्षभरात पूर्ण केलं जाईल अशी माहिती पुणे रेल्वे विभागाचे व्यवस्थापक राजेशकुमार वर्मा यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. पुणे रेल्वे विभागानं गेल्या आर्थिक वर्षात दोन हजार 238 कोटी रुपये महसूल मिळवला असून प्रवासी महसुलात 13 टक्के वाढ नोंदविण्यात आल्याचं ते म्हणाले. पुणे रेल्वे विभागात सध्या सतराशे कोटी रुपयांची विकासकामं सुरु आहेत. खडकी आणि हडपसर टर्मिनलच्या विकासाचा त्यात समावेश आहे.

**मनपा**

अलिकडच्या पावसामुळं पुणे शहरात निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महापौर मंजुषा नागपुरे यांनी तातडीनं आवश्यक उपाययोजना राबविण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. त्यानुसार शहरातील धोकादायक झाडे आणि फांद्या काढणं, झाडांची छाटणी करणं, तसेच नाले आणि गटारांची तातडीनं स्वच्छता करण्याची कामं युद्धपातळीवर हाती घेण्यात येत आहेत.

**अधिवास**

नद्यांमध्ये मिसळणारं सांडपाणी तातडीनं थांबविण्याची गरज असल्याचं मत इंद्रायणी सेवा अभियानाचे प्रमुख सोमनाथ मुसुडगे यांनी केलं आहे. रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे काल त्यांचा पुण्यात सत्कार करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. नदी प्रदूषित होऊ नये यासाठी गावकऱ्यांनी एकत्र आलं पाहिजे असं आवाहन देखील त्यांनी केलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 36 तर किमान 18 अंश सेल्सियस तापमानाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. गेले दोन दिवस ढगाळ वातावरणामुळं कमाल तापमानात घट झाली होती.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**